**दिनांक: ३ - ५ - २३**

**विषय: सोसायटी ची नियमित मासिक बैठक आणि पुनर्निर्माण संबंधी पुढील वाटचाल.**

काल दिनांक २ - ५ - २३ रोजी पंच समिती ची मासिक मीटिंग, संस्थे चे नेहमीचे कामकाज आणि संस्थे चे पुनर्निर्माण संबंधात, मागल्या महिन्यात झालेल्या घडामोडी तसेच पुढील कार्यक्रम, ह्या विषयांवर झाली. श्री विजय सावंत अध्यक्ष स्थानी होते.

१. सचिव श्री पटवर्धन यांनी एप्रिल ,२३ मधे केलेल्या संस्थेच्या कामांचा आढावा घेऊन नवीन आर्थिक वर्षात सभासदांकडून आत्ता पर्यंत जमा झालेल्या मेंटेनन्स ची एकूण रक्कम तसेच ऑडिट च्या दृष्टीने सर्व कामांची पूर्तता झाल्याचे सांगितले.

ह्या नंतर पुनर्निर्माण कार्याचा आढावा घेण्यात आला.

२. मागल्या महिन्यात २ एप्रिल रोजी सोसायटीतल्या काही सभासदांनी पंच समिती बरोबर बैठक घेऊन 'पुनर्निर्माणात जी अधिकची जागा सोसायटी ला मिळणार आहे त्याचे वाटप सर्व सभासदांन मधे सम समान असण्याच्या दृष्टी ने  सभासदांशी बोलून काही सुवर्ण मध्य निघतो कां' हे बघण्यासाठी ३० एप्रिल पर्यंत ची वेळ मागून घेतली होती. काल ह्या ग्रुप चे प्रवक्ते एड. श्री अमोल जोग यांनी पंच समिती चे श्री नेवाळकर यांना फोन करून सांगितले की यांच्या प्रयत्नांची पूर्तता, दिलेल्या अवधीत, होऊ शकली नाहीये आणि म्हणून पंच समिती ला ह्या विषया वर जे निर्णय पुढे घ्यायचे आहेत ते घ्यावे. पंच समिती च्या निर्णयाला ह्या समुहा चा पाठिंबा असेल आणि आवश्यक ते सहकार्य ही मिळेल.
श्री नेवाळकर यांनी श्री जोग यांचे कथन पंच समिती समोर मांडले.

३. संस्थे चे मालकी हक्क ब वर्गातून अ वर्गात बदलण्याच्या प्रोसेस मधे, पंच समिती सदस्य श्री सुवर्ण कांत ठाकोर यांचा प्रयत्नांनी, मागल्या शनिवारी दिनांक ३० - ४ - २३ रोजी सहकारी खात्या तर्फे आपल्या सोसायटी चा पंचनामा करण्यात आला. ह्या प्रोसेस मधे पंचनामा ही एक महत्त्वाची पायरी आहे. ह्याचा च पुढील टप्पा म्हणून कालच २४ सदस्यांच्या फायली पण श्री ठाकोर यांचा मदतीने संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. हे २४ ते सभासद आहेत ज्यांनी सोसायटीत १९७९ नंतर फ्लॅट्स विकत घेतले आहेत किंव्हा ज्यांना गिफ्ट स्वरूपात फ्लॅट्स मिळाले आहेत. ह्या अनुषंगाने आज असलेल्या सोसायटी सभासदांची यादी सरकारी रेकॉर्डस मधे अपडेटेड होईल.

४. पंच समितीच्या ह्या मीटिंग मधे असे ही नक्की करण्यात आले की ---

* १२ डुप्लेक्स फ्लॅट्स हे पुनर्निर्माणा नंतर वाढीव जागे सह ग्राउंड / पोडीयम वरच स्वतंत्र असेच असतील.

** मिळणारी वाढीव जागा प्रत्येक सभासदाला टक्केवारी अनुसार देण्यात येईल.

* समाज मंदिरा साठी २०००० स.फु. जागे ची रचना कशी असावी हे ठरविण्या करिता श्री पटवर्धन, श्री नेवाळकर आणि श्री लेले यांची एक उप समिती गठित केली गेली. ही समिती पुढील ८/१० दिवसात सर्वधृष्टी ने चर्चा करून पंच समिती च्या मंजुरी साठी नवीन समाज मंदिरा चे प्रारूप ठेवेल.

५. पुनर्निर्माणा साठी आपण ज्या तीन विकसकांची निवड केली आहे त्यांच्या सर्व पार्टनरर्स ची तसेच त्यांच्या कंपन्या ची सखोल आर्थिक चौकशी ही, ह्या मधल्या काळात, आपले एक सभासद सी ए श्री अनिरुद्ध अनगळ यांच्या मदतीने स्वतंत्र पणे करण्यात आली आहे आणि त्यावरून असे दिसते की हे

तिघे ही विकसक आपला प्रॉजेक्ट पूर्ण करण्यात आर्थिक दृष्ट्या पूर्ण पणे समर्थ आहेत. ही माहिती सचिव श्री पटवर्धन यांनी पंच समिती ला दिली.

६. ह्या मीटिंग मधे असे ही ठरविण्यात आले कि --

७. ह्या मीटिंग मधे सखोल चर्चे अंती असे ही ठरविण्यात आले कि प्रत्येक सभासदाला पुनर्निर्माण प्रक्रियेत जितकी वाढीव जागा मिळणार आहे त्यात कमी - जास्त जागा करण्याचा पर्याय नसावा.

* सर्व सभासदांना झालेल्या घडामोडींची माहिती देण्या साठी सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांचा एक मेळावा रविवार दिनांक २१ - ५ - २३ रोजी सकाळी १० वाजता आपल्या मधुकर जोशी सभागृहात घ्यावा. तसेच

** रविवार दिनांक २८ - ५ - २३ रोजी सकाळी १० वाजता एक विशिष्ट सर्व साधारण सभा आपल्या सभागृहात घ्यावी ज्यात मिळणाऱ्या अधिक FSI चे वाटप टक्केवारी ने करण्या साठी तसेच आपल्या विश लिस्ट मधे दिलेल्या सर्व शर्ती आणि अटिं साठी GB ची मान्यता घेण्यात यावी.
ह्या संबंधात आवश्यक ती नोटीस सचिव श्री पटवर्धन काढतील.

वरील कामकाजा नंतर अध्यक्ष श्री सावंत यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समितीच्या वतीने**